प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९-१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेल्या ध्यानाचा आणि भावना आणि विचारांच्या सकारात्मकतेचा एक विशिष्ट मार्ग आहे.

### दृढ वचन

- ★ आपण दिव्य प्रकाशाचा (परमेश्वर) एक कण आहोत
- ★ प्रेम हा आपला मूळ स्वभाव आहे
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 1 Issue 10 JULY 2009 Rs. 15

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे

एका समाज सेवकाचा आश्रम, शासनाच्या क्रुद्ध यंत्रणेने धुळीस मिळवला. आश्रमातील टी.व्ही., कंप्यूटर्स, कागदपत्रं, भांडी आणि इतकेच काय तर खेळणी सुद्धा नष्ट करण्यात आली. त्या समाज सेवकाने ती रात्र आपल्या बायको व दोन मुलींसोबत एका झाडाखाली घालवली. नंतर जेव्हा एका पत्रकाराने त्याला विचारले की, या अनुभवाबद्दल त्याला काय वाटते, तेव्हा तो म्हणाला की, जेव्हा त्याने हे कार्य हाती घेतले होते तेव्हाच त्याला माहीत होते की, कधी न कधी अशा अनुभवांना त्याला तोंड द्यावे लागणार आहे. तरीपण तो शांत होता आणि त्याच्या मनात कोणत्याही प्रकारचा कडवटपणा नव्हता!

इतिहास या गोष्टींची ग्वाही देते की, जेव्हा काही लोक शाश्वत सत्यांबद्दल बोलले आणि जेव्हा त्यांनी प्रेमाची शिकवण दिली, तेव्हा त्यांना जिवंत जाळण्यात आले, त्यांना क्रूसावर चढवून खिळे ठोकून ठार करण्यात आले किंवा त्यांना अतोनात यातना देण्यात आल्या. या लोकांना, त्यांचे कार्य हाती घेण्यापूर्वीच त्यांच्या अशा भयानक शेवटाची जाणीव होती.

मला या गोष्टीचे कुतूहल वाटते की, ही लोकं कुठल्या कारणामुळे अशा कार्याची निवड करतात आणि जेव्हा त्यांना अन्याय आणि अत्याचाराला सामोरे जावे लागते, तेव्हा सुद्धा ते शांत आणि धैर्यशील कसे काय राहतात! कोणती शक्ती त्यांना एवढे साहस आणि प्रेरणा देते!

क्रोध, संबंधांमधे दुरावा निर्माण करतो. रागात आपण घाई-घाईने निर्णय घेतो आणि रागामुळे आपले मन घृणेने भरून जाते. रागात आपण चुकीचे निर्णय घेतो. आपल्याला हे सर्व माहीत असून सुद्धा आपण रागाला बळी पडतो. रागात आपण संबंध तोडून टाकतो, आपल्या आयुष्यातील एक भागच गमावून बसतो आणि आपले आध्यात्मिक पतन होते. राग बाजूला ठेवून, लोकांशी आपले संबंध खराब न करता, आपले जीवन न गमावता राहणे शक्य आहे का? होय, शक्य आहे. आपण तसा प्रयत्न करून पाहत नाही, हेच खरे आहे.

रागाला बाजूला ठेवून त्याला विरून जाऊ देणे शक्य आहे. एखाद्या व्यक्तिला, त्याने क्षमा मागण्यापूर्वीच किंवा त्याने कधीच क्षमा मागितली नाही तरीही, क्षमा करणे शक्य आहे. या जगामुळे प्रभावित न होता, हिमालयासारखे विशाल राहून आणि कोणत्याही परिस्थितीत हादरून न जाता राहणे शक्य आहे. नक्कीच हे सर्व शक्य आहे, पण आपण त्याची निवड करायला हवी. आपल्या ध्यान साधकांजवळ दुसरा पर्याय नाही. आपण याप्रमाणेच राहायला हवे. आपण प्रेम प्रकट करायलाच हवे आणि क्षमा करायलाच हवी. आपण जर हे करू शकलो नाही तर आपल्या ध्यान करण्याचा काय उपयोग आहे? मग ध्यान करणे म्हणजे फक्त एका मुद्रेत बसण्यासारखे असेल, फक्त एक फॅशन असेल.

१८ मे, २००९, या दिवशी अंतर-वनात नव्या आणि महान शक्ती प्रस्थापित करण्यात आल्या. सात निवडक लोकांनी महान 'रा'च्या, दुर्मिळ शक्तिंचे ८ जून ते १४ जूनपर्यंत, सात दिवस प्रवहन केले. महान 'रा' यांना प्रकाश ब्रह्म म्हणतात. अशा या गौरवशाली सात दिवसांमधे काय घडले, ह्याची काही माहिती, आपली विशेष माध्यम 'सुवाहिनी', हिने गोळा केली. ही माहिती पुढील एका पुस्तकात नमूद करावी अशी माझी इच्छा होती. पण लगेचच एका पुस्तिकेत ही माहिती छापून आणण्याचा मोह मी टाळू शकलो नाही. आपल्या ध्यान-साधक परिवाराला ही अद्‌भुत माहिती लवकरात लवकर मिळावी, यासाठीच मी असे केले. ही माहिती सध्या इतर लोकांसाठी नाही तर फक्त आपल्या साधक परिवारासाठी आहे.

या पुस्तिकेची प्रत मिळवण्यासाठी आपण मानसा कार्यालयाशी संपर्क करू शकता.

मी पुष्कळ दिवस माझ्या ब्लॉगवर काहीच लिहू शकलो नाही. याबद्दल पुष्कळ लोकांनी मला विचारले. माझ्याबद्दल लोकांना वाटणारी काळजी पाहून आणि त्यांचे माझ्यावरील प्रेम पाहून माझे मन भरून आले. मी ब्लॉगवर काहीच लिहू शकलो नाही, कारण काय लिहावे, यावर मी काही विचार करू शकलो नाही, मनन ही करू शकलो नाही. काही दिवसांसाठी मी थोडा अस्वस्थ झालो होतो.

मी नक्कीच लिहीन. लिहिण्यासाठी आणि जगण्यासाठी बऱ्याच गोष्टी आहेत!

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, बंगलोर अर्बन ५६२ १४९. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, २२७१५५०१ (सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत)
इ-मेल : info@saptarishis.com वेबसाईट : www.saptarishis.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिले कॉलम वाचावे.

Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)
वार्षिक वर्गणी रू. २००/-

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



एन. जी. गोल्लाहल्ली येथे येल्लम्मा देवीच्या देवळाचे बांधकाम चालू आहे.



गुरुजी कर्नाटक राज्य चार्टर्ड अकाऊंटंट्स असोसिशनच्या एकविसाव्या वार्षिक परिषदेत.

### काही ठळक घडामोडी

- ज्या बाहेरील विद्यार्थ्यांना दररोज तीन तास ध्यान करण्याची इच्छा आहे, ते रोज तीन तास ध्यान करण्याला सुरुवात करू शकतात. अशाप्रकारे एक महिना ध्यानाचा अभ्यास केल्यानंतर त्यांनी आम्हास त्याचा अहवाल पाठवावा.
- अंतरवनामध्ये 'द टेंपल ऑफ लाईट' चे बांधकाम सध्या चालू आहे.

### ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०२ | गुरुवार | शुक्ल दशमी |
| ०७ | मंगळवार | गुरु पौर्णिमा, चंद्र ग्रहण<br>दुपारी २.०२ ते ४.१५ पर्यंत |
| १५ | बुधवार | कृष्णाष्टमी |
| १६ | गुरुवार | दक्षिणायन प्रारंभ |
| २० | सोमवार | शिवरात्री |
| २२ | बुधवार | अमावस्या, सूर्य ग्रहण<br>सकाळी ५.२८ ते १०.४३ पर्यंत |
| ३१ | शुक्रवार | महालक्ष्मी उपासना |

### रविवारच्या प्रसादाचे प्रायोजक

| | |
|---|---|
| एक हितचिंतक | ०३-०५-२००९ |
| एम. एन. अन्नपूर्णा आणि चंद्रकला डी. | १०-०५-२००९ |
| एल. शारदम्मा | १७-०५-२००९ |
| बी. एस. कृष्णमूर्ती, शशांक आणि अजय कुमार | २४-०५-२००९ |
| अंजली पाटील | ३१-०५-२००९ |

### तपोनगरातील कार्यक्रम

| | |
|---|---|
| दर रविवारी | – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत |
| | – विशेष ध्यान, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| दर शुक्रवारी | – लाईट चॅनलिंगचे कार्य सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत |
| ७ जुलै | – गुरु पौर्णिमे निमित्त विशेष ध्यान मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| | – चंद्र ग्रहणानिमित्त विशेष ध्यान दुपारी २.०२ ते ४.१५ पर्यंत |
| १२ जुलै | – शंबला गटाची बैठक दुपारी २ वाजता |
| २२ जुलै | – सूर्य ग्रहणानिमित्त विशेष ध्यान सकाळी ५.२८ ते १०.४३ पर्यंत |

### आनेकल येथील कार्यक्रम

- सप्तर्षी ध्यान केंद्र, आनेकल येथे दर सोमवारी संध्याकाळी ६ वाजता आणि मंगळवारी सकाळी ६ वाजता ध्यानाचे वर्ग भरतात.
- प्रत्येक पाचव्या रविवारी आनेकल येथील वेगवेगळ्या आध्यात्मिक मार्गांचे साधक सप्तर्षी ध्यान केंद्र, आनेकल येथे एका लहान बैठकीकरता जमतात.

रू. २००० देऊन रविवारच्या प्रसादाचे आणि रू. ५००० देऊन वृत्तपत्राचे प्रायोजक आपण होऊ शकता.

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल, अनुवाद : वैशाली जोशी

गुरुजींचा वाढदिवस असल्यामुळे मे महिना हा वर्षातील सर्वात उत्तम महिना ठरतो. १७ तारखेला रात्री तपोनगरातील रहिवासी डाइनिंग हॉल मधे गुरुजींच्या वाढदिवसानिमित्त जमले होते. सुमारे पन्नास लोकांनी ह्यात आनंदाने भाग घेतला. काही उत्साही रहिवाशांनी हॉल सजवला होता.

१८ मे ला गुरुजींना त्यांच्या वाढदिवसानिमित्त सृष्टीकडून सर्वात उत्तम भेट मिळाली. ह्या दिवशी अंतरवनाचे उद्घाटन करण्यात आले आणि 'रा' (RA) प्रकाशाची तेथे स्थापना करण्यात आली. अंतरवन हे अंतर–मानसाच्या शेजारी स्थित एक अतिशय सुंदर उद्यान आहे. ही जागा नवीन असून देखील येथील वातावरणात जिवंतपणा आहे व येथील शक्ती प्रत्येकास त्याच्या आंतरिक गाभ्यात प्रवेश करण्यास मदत करतात. आणि म्हणूनच ह्या जागेला दिलेले नाव 'अंतरवन' अगदी योग्य आहे. उद्यानात काळजीपूर्वक छाटलेली हिरवीगार पालवी व त्यातून नीटपणे आखलेल्या पाऊलवाटा सुव्यवस्था दर्शवितात परंतु उद्यानाच्या परिसरापलीकडे सभोवताली मात्र दाट रान आहे. जवळच एक विहीर आहे ज्यात सतत बोर–वेल चे पाणी पाइप ने पंप केले जाते व त्याच्या आवाजामुळे एखादा झरा जवळ वाहतो आहे, असे वाटते.

गुरुजींच्या वाढदिवसाचा समारंभ मात्र पुढील रविवारी २४ मे रोजी साजरा करण्यात आला. त्यादिवशी तपोनगरास शेकडो फुलांनी सजवले गेले. पहाटे ६ वाजल्यापासूनच तयारीला सुरुवात झाली. जेवण साधे असले तरी नेहमी प्रमाणे स्वादिष्ट होते. ४०० पेक्षा अधिक लोकांनी समारंभात भाग घेतला. बहुतेक जण प्रसंगविशेषासाठी नवनवे पोषाख घालून आले होते. फुले, भेटवस्तू व सर्वांचा आनंद, गुरुजींविषयी असलेल्या उत्कट प्रेमाचे प्रतिनिधित्व करीत होते. सर्वांच्या उत्कट भावना स्पष्ट जाणवत होत्या. त्यादिवशी दहा पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले व सर्व लेखक/लेखिका आणि अनुवादक/अनुवादिकांचा सत्कार करण्यात आला. 'लाईट' ह्या पुस्तिकेच्या एक हजार प्रती एका दिवसात विकल्या गेल्या. हा विक्रम पुरेसा नव्हता म्हणून की काय ह्या पुस्तिकेच्या दुसऱ्या हजार प्रती देखील मे महिन्याच्या शेवट पर्यंत जवळजवळ सगळ्या विकल्या गेल्या. प्रत्येकास गुरुजींकडून वैयक्तिक आशीर्वाद मिळाल्यामुळे प्रत्येकाला कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. ❑

## प्रगतीचे चिन्ह

श्यामला देवी, अनुवादः गुरुराज कानाडे

नियमित व प्रामाणिक ध्यानसाधना आणि सर्व पातळींवर परिवर्तन यामुळे आपली आध्यात्मिक प्रगती घडते. पण तरीही आपण आपल्या आध्यात्मिक प्रगतीबाबत काळजी करतो व त्याबद्दल जाणून घेण्यास उत्सुक असतो. जेव्हा जेव्हा आपल्याला साधनेच्या त्याच पातळीवर ध्यान करण्यास सुचविण्यात येते तेव्हा आवश्यक ती आध्यात्मिक प्रगती आपण केली नाही असे समजून आपण चिंतित होतो. तसेच साधनेच्या पुढील पातळीवर बढती मिळाल्यास आपली बरीच आध्यात्मिक प्रगती झाली असे समजून आपण खूष होतो. आपण हे जाणायला हवे की, आपल्याला स्वतःमध्ये बदल घडवता यावा, यासाठी, नव्या जोमाने परत प्रयत्न करण्याची संधी मिळावी म्हणून बऱ्याच वेळा ही बढती ऋषींच्या प्रेमामुळे व त्यांच्या कृपेमुळे मिळते. ही बढती, आपण फक्त किमान अपेक्षेच्या पातळीवर जरी असलो तरीही दिली जाते. त्यामुळे बढती मिळाली म्हणून खूष होऊन आपण स्वस्थ बसू नये.

आध्यात्मिक प्रगती ही प्रत्येक क्षणी होणारी प्रगती आहे. ती आपण प्रत्येक क्षण कसा जगतो यातून प्रकट होत असते. ती आपल्या प्रत्येक भावना व विचारांतून व्यक्त होत असते. त्यामुळे प्रत्येक क्षणी आपण आध्यात्मिक असतो वा आध्यात्मिक नसतो. तसेच प्रत्येक क्षणी आपली प्रगती होत असते किंवा अधोगती होत असते. जीवनातील महत्त्वाच्या घटना आपली आध्यात्मिक पातळी ठरवीत असतात.

मी टी.व्ही वर एका आईला, तिचे मूल तिला सोडून गेले म्हणून, स्वतःचा उर बडवून आक्रोश करताना पाहिले. मृत्यु एक फार मोठे नुकसान आहे आणि एका आईसाठी तर ही दुःखाची परिसीमाच आहे. मी स्वतःशीच विचार केला की हे दुःख इतक्या उघडपणे व्यक्त करणे योग्य आहे का? काही दिवसांनंतर, एका पित्याचे, आपल्या मुलाच्या मृत्युनंतर देखील असलेले मानसिक स्थैर्य पाहून मी निःशब्द झाले. मी स्वतःशीच विचार केला की, ही आध्यात्मिक प्रगती नव्हे तर आणखी काय आहे! आणि त्याना लाभलेली ही शांतता त्याना मिळालेल्या ज्ञानाचा, त्यांच्या व्यक्तिगत ध्यानाचा व परिवर्तनाचा परिणाम आहे.

सत्य समजावून घेणे, नियमित ध्यान व प्रामाणिक प्रयत्न ही आध्यात्मिक प्रगतीची चिन्हे आहेत. ❑

## प्रकाश प्रसारणाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणातील चळवळ आहे. आपल्या या जगात सर्वांना शांती आणि प्रेमाचे जीवन जगता यावे त्यासाठी ही चळवळ आहे. व्याख्यानं, उपदेशं आणि पताका नसलेली ही अशी वेगळीच चळवळ आहे. वरील उच्च जगांतून फक्त प्रकाश पृथ्वीवर आणावा आणि सर्वत्र प्रसारित करावा, एवढेच पुरेसे आहे. शब्द जे करू शकत नाही, ते सर्व हा प्रकाशच घडवून आणू शकतो.

जेव्हा आपण हा प्रकाश सर्वत्र पसरवतो, तेव्हा तो इतरांच्या घरात व त्यांच्या हृदयात प्रवेश करतो. त्यांच्या भावना आणि विचारांमधे असलेल्या अंधःकाराला हा प्रकाश दूर करतो आणि अशाप्रकारे वैयक्तिक बदलाव होतात. वैयक्तिक बदलावांमुळे सर्व जगच बदलायला सुरुवात होते आणि प्रकाशमय होते.

हा प्रकाश म्हणजे आपल्या डोळ्यांना दिसत असलेला प्रकाश नसून हा अस्तित्वाच्या गाभ्यातील अतिसूक्ष्म प्रकाश आहे. अस्तित्वाच्या ह्या गाभ्यातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्वकाही आहे; ताकद आहे, शहाणपण आहे आणि सृष्टीचे भवितव्य पण आहे. तो अदृश्य आहे पण सर्वत्र पसरलेला आहे.

**आपण दर रोज ७ मिनिटांसाठी हा प्रकाश वरून पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवू शकतो. झोपून उठल्यावर सकाळी आणि रात्री झोपण्यापूर्वी आपण ह्याचा अभ्यास करू शकतो आणि या जगात बदल घडवून आणू शकतो.**

या जागतिक चळवळीची सुरुवात १८–५–२००८ ला तारामंडलीय परिषदेनी, सप्तर्षींनी, गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत सुरु केली.

ही माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवावी.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**प्राचीन ऋषींनी दिलेली ही सात तत्त्वे आहेत. आपल्या पृथ्वीवर असलेले प्रकाशाचे शहर शंबला येथे राहणारे लोक या तत्त्वांचा अभ्यास करतात. शंबलातील लोक चिरतरुण आहेत आणि ते शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगत असतात.**

१. आपल्या अंतरंगात, गाभ्यात असलेल्या प्रकाशाचा अनुभव करावा आणि सभोवताली पसरवावा.
२. प्रेमाचा अनुभव करावा आणि हे प्रेम सर्वत्र पसरवावे.
३. सर्व जीवांमधे आणि सर्व निर्जीव वस्तुंमधे जीवनाच्या एकत्वाचा अनुभव करावा.
४. दिवसाची सुरुवात करतांना, त्यादिवशी जी कामं करायची आहेत, ती आधी मनात ठरवावी, मग ती हळू आवाजात स्वतःशीच पुटपुटावीत आणि मग ती कामं प्रत्यक्ष करावीत.
५. आपले ध्येय पूर्ण होण्याआधी त्याबद्दल कमीत कमी बोलून, गुप्ततेच्या नियमाचे पालन करावे.
६. आपल्यातील नकारात्मक शक्तींशी लढा देण्यासाठी मन, बुद्धी आणि शरीर यांना एकजूट करावे.
७. उच्च आध्यात्मिक ध्येय गाठण्यासाठी आपण स्वतःहून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवावी.

# गुरुजी उवाच

(संकलन : शोभा राव, अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

०३.०५.२००९

मी मुद्दामच लांबलचक स्पष्टीकरणे देण्याचे टाळतो कारण जितके आपण जास्त स्पष्ट करतो तितके त्यातले मर्म कमी समजले जाते. उदा. भगवद्गीता वाचा. त्यात भगवान कृष्णाने आपल्याला काही विशेष गोष्टी सांगितल्या. परंतु अनेक विद्वानांनी त्याला स्वतःचे निरूपण जोडले. ही समालोचने तज्ज्ञ माणसांनी केली आहेत. आपण त्यांच्याबद्दल किंचितही अनादराने बोलता कामा नये. पण होते काय की कुठेतरी आपण या गोष्टी तर्काच्या आधारावर समजून घेण्याचा प्रयत्न करतो आणि आपलं तर्कशास्त्र सत्याव्यतिरिक्त इतरही निराळ्या गोष्टी समोर आणतं. म्हणूनच मी काही गोष्टी थोडक्यात सांगायचा प्रयत्न करतो. तुम्ही त्यावर विचार करून, जे मी सांगितले त्यापासून कितीतरी अधिक समजून घेऊ शकता.

ह्या विश्वाच्या प्रती आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या आहेत; केवळ समाजाच्या, राष्ट्राच्या किंवा जगाच्या साठी नव्हे तर संपूर्ण सृष्टीच्या साठी आहेत. याची जाणीव करून घेऊन आपण ती पार पाडली पाहिजेत. जर आपण हे केले नाही तर कोणी आपल्याला धारेवर धरणार नाही की शिक्षा करणार नाही. पण विश्व स्वाभाविकपणे तिकडे काणाडोळा करीत असले तरी कायदे आपलं काम करतच असतात. यावर जरा चिंतन करा.

जरी पारंपारिक आध्यात्मिक विचारधारा सांगते, "तुम्हाला भावना असू नयेत", मी म्हणतो की आपल्याला भावना असायलाच हव्यात, नाहीतर आपण माणसेच असू शकत नाही. आपण भावना व्यक्त करायला हव्या, आपण हळवे असायला हवे. नाहीतर आयुष्यात आपण अनेक गोष्टींना मुकतो. भावनाप्रधान असण्यात चुकीचे काहीच नाही, जरी आपले वडीलधारे याच्या विरोधात बोलत. कदाचित काळाच्या एका विशिष्ट वळणावर तशी गरज असावी. मी म्हणतो, "माणसाने प्रत्येक क्षणी आयुष्य साजरे केले पाहिजे. माणसाने भावनाप्रधान असले पाहिजे आणि माणसाने हळवे असले पाहिजे." भावनाप्रधान आणि हळवे असणे हे व्यक्तिगत पातळीवर असते. पण जिथे कामाचा संबंध येतो, तिथे भावना व हळवेपणाला थारा नसतो. तिथे काही व्यक्तिगत नसते. जेव्हा आपण कामाकडे गांभीर्याने पाहतो तेव्हा सगळ्या भावना, सगळ्या संवेदना आणि सगळी नाती नाहीशी होतात. फक्त कामाशी नातं उरतं. आपण जेव्हा अशा तऱ्हेने काम करतो तेव्हा आपल्याला त्याचे सौंदर्य आणि मोठेपण समजते. काम हीच साधना आहे. कशामुळे माणसे भूक विसरून, झोप विसरून रात्रभर बसून काम करतात? त्यामागे प्रेम असते; कामावरचे प्रेम, ईश्वरावरचे प्रेम! आपण जे काम करतो ते ईश्वराचं समजून करतो. जेव्हा आपण इतक्या प्रेमाने काम करतो तेव्हा साधनेची गरज उरत नाही. ईश्वर सर्व गोष्टींची काळजी घेतो.

आर्थिक मंदीप्रमाणेच स्वाईन फ्लू हा २०१२ सालातील आपल्या सत्ययुगातील प्रवेशाच्या परिणामाचा एक भाग आहे. १९७८ साली, महर्षी अमरांना ऋषींकडून मिळालेल्या निरोपात नवीन येऊ घातलेल्या रोगांविषयी आणि साथींविषयी माहिती होती. स्वाईन फ्लू बद्दल बहुदा आधी भाकीत केले असावे. आध्यात्मिक पातळीवरून त्याला हाताळायचा काहीतरी मार्ग असला पाहिजे. तंत्र अवगत असतांना आणि त्याविषयीचे ज्ञान असतांना सुद्धा आपण ते व्यवहारात वापरत नाही. इथेच आपण पराभूत होतो. रोग प्रथम सूक्ष्म शरीराला होतो. जर आपण सूक्ष्म शरीरावर उपचार केले तर आपल्याला रोग होणार नाही. स्वाईन फ्लू किंवा तत्सम दुसऱ्या कोणत्याही रोगाला स्थूल शरीरात प्रवेश करण्यापूर्वी प्रतिबंध केला जाऊ शकतो. हे सर्व आध्यात्मिक स्तरावरून हाताळता येऊ शकते. याच्या पाठीमागे एक संपूर्ण शास्त्र आहे.

एकात्मतेचा अनुभव घेणे फार महत्त्वाचे आहे. जेव्हा तुम्ही संपूर्ण मानवजातीशी एकात्मता अनुभवता, तेव्हा संपूर्ण मानवजातीची शक्ती तुमची शक्ती बनते. पाण्याचा एक थेंब समुद्रात मिसळल्यावर सामर्थ्यशाली सागर बनून जातो. तसेच मी म्हणतो, "ईश्वराशी तन्मय व्हा, प्रकाश बना." केवळ प्रकाशाला अनुभवण्याचा प्रयत्न करून हे साध्य होणार नाही. तुम्हाला प्रकाश बनावे लागेल, परमेश्वराशी एकरूप व्हावे लागेल. तेव्हा तुम्हाला त्याच्या सर्व शक्ती प्राप्त होतील. अशा रीतीने ऋषी उच्च पातळीवर तप करतात आणि परमेश्वराशी एकरूप होतात. त्यानंतर त्यांच्याकडे परमेश्वराच्या सर्व शक्ती, त्याच्या सर्व ऊर्जा येतात आणि त्याचबरोबर त्याच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये पण येतात. त्या अवस्थेला पोचल्यावर तुम्ही तारामंडळे निर्माण करू शकता. तुम्ही पराकोटीच्या वाईटाला दूर ठेवू शकता. या संपूर्ण मानवतेच्या प्रेमाचे पांघरूण तुमच्या बरोबर असते. हा चिंतनाचा मुद्दा आहे. तुम्ही जेव्हा चिंतन कराल तेव्हा गूढ जगताच्या खोल स्तरांवरून अधिक साक्षात्कार होतील. ते तुमचे स्वतःचे वेद, अगदी तुमचे वैयक्तिक वेद असतील.

१०.०५.२००९

मानसिक अनुभवांपासून सावध राहा. आपल्याला फसवण्यात मनाला खूप आनंद मिळतो. मन हे स्वतंत्र व्यक्तित्व असते. ते आपल्याला विलक्षण मानसिक अनुभव देते व स्वप्नदृश्ये दाखवते. आपल्याला कशाने आनंद होतो ते त्याला माहीत असते आणि मन आपल्याला तसेच अनुभव देते. आपण त्यामुळे कधीही फसू नये. म्हणूनच मी वारंवार तुम्हाला अनुभवांच्या पलीकडे जायला सांगतो. कधीकधी आपल्याला अगदी अस्सल अनुभव येतात. आपल्या अंतःप्रेरणेच्या मदतीने आपण त्यांची खात्री करू शकतो. आपल्याला हे माहीत पाहिजे की आपली साधना जेव्हा कमकुवत असते तेव्हा आपल्याला जास्त अनुभव येतात. आपल्या अनुभवांबाबत आपण सावध राहिले पाहिजे आणि तिकडे दुर्लक्ष केले पाहिजे. किंवा त्या अनुभवांची दखल घेऊन त्या पलीकडे गेले पाहिजे. मानसिक अनुभव कोणते आणि आत्म्याचे अनुभव कोणते ते आपल्याला समजते. आपण आत्म्याच्या अनुभवांची आराधना केली पाहिजे.

बुद्धीमुळे मिळणारे ज्ञान अर्धवट असते. अनुभवच आपल्याला संपूर्ण ज्ञान देतो. अनुभव ज्ञानापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. हे जाणून घेणे फार महत्त्वाचे आहे. यावर सखोल विचार करा. आपण प्रेम, शांती, सत्य, स्तब्धता, विस्तृतता इ. अनेक गोष्टींबद्दल बोलतो; त्यावर व्याख्यान देतो. त्या केवळ शब्दरूपाने उरतात जेव्हा तुम्ही त्यांना बुद्धीने जाणता आणि प्रत्यक्ष अनुभवत नाही. आपण ते प्रत्यक्ष अनुभवले पाहिजे. साधनेचा तोच उद्देश असतो. असे अनुभव ध्यानाने येतात.

एका माणसाने भाष्य केले, "तुम्ही सांगता की तुम्ही व्यक्तिगत मंत्र व धारणा देता. पण प्रत्यक्षात तुम्ही प्रत्येकाला सारखाच मंत्र व धारणा देता." मी समजावून सांगितले की जेव्हा तुम्ही सागरातून बाटली भरून पाणी घेता तेव्हा ते तुमचे पाणी होते. त्याचप्रमाणे तोच मंत्र जेव्हा तुम्हाला दिला जातो तेव्हा तो तुमचा मंत्र होतो. आम्ही जेव्हा मंत्र देतो तेव्हा आम्ही प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिगत शक्ती सुद्धा देतो ज्या व्यक्तीसापेक्ष असतात आणि त्या व्यक्तिच्या शरीरसंस्थेला सुसंवादी बनवतात. प्रत्येकाकडे सारखीच शक्ती संक्रमित केली जात नाही.

आम्ही तातडीने अभ्यासक्रम बदलणार आहोत. त्यानुसार एक वर्ष व तीन महिन्यात साधक एनलाईटनमेंटच्या टप्प्याची दीक्षा घेण्यास पात्र होईल. या टप्प्यात काही कालमर्यादा नाही. जर तुम्ही आमच्या सूचनांचे तंतोतंत पालन केले तर

# गुरुजी उवाच

(संकलन : शोभा राव, अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

तुम्हाला दिसेल की तुम्हाला ज्ञानप्राप्ती होते आहे. ते अखेर तुमच्या साधनेवर अवलंबून आहे. इथून पुढे आपल्याला सर्वांनाच एका बैठकीत जास्त वेळ ध्यानाला बसण्याची सवय करायला लागणार आहे. वेगाने जवळ येणाऱ्या २०१२ सालाच्या दृष्टिकोनातून हे फार महत्त्वाचे आहे. आता युद्धपातळीवर तयारी सुरू झाली आहे.

आपल्याला २०१२ साठी तयारी करायला हवी. फोटॉन बेल्टशी वार्तालाप करण्याचे प्रशिक्षण आपल्याला घेतले पाहिजे. आता यापुढे फोटॉन बेल्ट आपला गुरू होईल. त्याच्याकडून सूचना मिळवण्यासाठी तुम्हाला बदलायला हवं, सुसंवादी बनायला हवं आणि सुसज्ज व्हायला हवं. हा मार्ग ध्यान करायला व सकारात्मक बनायला सांगतो. मला तुमच्यात असे बदल झालेले पाहायचे आहेत.

२४.०५.२००९

प्रत्येक वाढदिवशी आपण नव्याने जन्मतो. शरीर जरी तेच असले तरी पेशी निराळ्या असतात. आपण पूर्वीची माणसे राहात नाही. आजच्या वाढदिवशी मी एक निराळा माणूस आहे. तुमच्या समोर आज कोणी नवीन माणूस बसलेला आहे. आजच्या प्रसंगी माझ्या ज्या कार्यसिद्धींबद्दल लोक बोलले, त्यावर मी म्हणेन की हे सर्व तुमच्यामुळे घडले आहे. मी नेहमी शिखराचे उदाहरण देतो. शिखर उंच उठून दिसते आणि आपण त्याचे कौतुक करतो. मी त्या शिखराप्रमाणे आहे. पण प्रत्येक शिखराला पाया असावा लागतो. तुम्ही तो पाया आहात. पायाशिवाय शिखर असूच शकत नाही. त्यामुळे हे श्रेय आपण वाटून घेऊया. मला खूप काही बोलायचं आहे. पण का कोण जाणे शब्द सापडत नाहीयेत. काहीतरी आहे जे मला बोलायला देत नाही. हे मी स्पष्ट करून सांगू शकत नाही. कदाचित तुमच्या प्रेमाने भारावून गेल्यामुळे मी मूक झालो आहे, निःशब्द झालो आहे. मला जे सांगायचे असते ते पुष्कळदा मी सांगू शकत नाही. बहुदा मी ते पुन्हा केव्हातरी सांगण्यासाठी राखून ठेवत असतो.

माझ्या वाढीव आयुष्याबद्दल मला कल्पना आहे. ऋषींची कृपा माझ्या माध्यमातून कार्यरत आहे. त्यामुळेच तुमच्यासमोर बसून मी हसू शकतो आहे. माझ्या भूतकाळाविषयी आणि वर्तमानकाळाविषयी मी अतिशय समाधानी आहे. मला पश्चात्ताप होत नाही आणि माझी कशाबद्दल तक्रार नाही. भविष्यातील काही गोष्टी मी जाणतो त्याही मी स्वीकारलेल्या आहेत. जर ऋषींनी मला त्यांच्याबरोबर बोलावले तर हे शरीर सोडून, मागे वळूनही न पाहता मी त्यांच्याबरोबर जाईन. कोणत्याही क्षणी काहीही स्वीकारायची माझी तयारी आहे. माझे आयुष्य माझ्या गुरुंना आणि ऋषींना वाहिलेले आहे. त्यांना हवा तसा त्याचा ते उपयोग करू शकतात. मी केवळ एक साधन आहे.

बऱ्याचदा मला एकटे वाटते, कारण मला जे सांगायचे असते ते समजून घेण्यास लोक असमर्थ ठरतात. मला जे एकाकी वाटते, ते माझ्यातल्या मानवी भागाला वाटते हे मी जाणतो. उर्वरित भाग कधीच एकाकी नसतो. माझे गुरू आणि परमेश्वर हे सतत माझ्याबरोबर असतात. मला वाटते आपण आपल्या एकटेपणाबद्दल कधी कुरकुर करू नये. मला खरं तर एकटेपणाचा फायदाच झालेला आहे. त्याची मला बहुदा चिंतन करण्यात आणि प्रगती साधण्यात मदत झाली असावी. एकटेपणाची आध्यात्मिक उन्नती साधण्यासाठी मदत होते.

मी कोणी फार मोठा माणूस नाही परंतु माझ्या पाठीशी ऋषी आहेत. माझ्याजवळ जे थोडेफार शहाणपण आहे ते मी ऋषींकडून मिळवलेले आहे. माझा उर्वरित भाग निराळ्या जागी तपाचरण करीत आहे ह्याची मला जाणीव आहे. माझ्यापाशी असलेल्या शक्तींबाबतीत मी अनभिज्ञ मुळीच नाही. पण मी नेहमी ऋषींचा विचार मनात आणतो आणि नम्र राहतो.

मी स्वतःला जे आणखी अलिप्त करतो ते केवळ अधिक काम करण्यासाठी. जितका मी जास्त अलिप्त होईन तितकं मला स्वतःला ज्ञानाने व शक्तींनी अधिक संपन्न बनवता येईल. शक्ती व ज्ञानाच्या रूपात मी जे संपादन करतो ते सर्व तुमच्यासाठी असते. त्यामुळे जितका मी अधिक एकांतवासात राहीन तितके ते तुम्हा सर्वांसाठी अधिक फायदेशीर ठरेल. जितका मी तुमच्यापासून दूर राहीन तितकाच मी तुमच्या जास्त जवळ असेन हा विरोधाभास नाही. एका वेगळ्या पातळीवर मी खूप काही अधिक करू शकतो. ज्या वेळी तुम्हाला खरोखर बिकट समस्या भेडसावतील त्या वेळी मदत मागायला कचरू नका. मला तुम्हाला सांगायचे आहे, “मी कोणी फार मोठा माणूस नसेन पण माझा खांदा चांगला रुंद आहे. संपूर्ण जग माझ्या खांद्यावर डोकं टेकू शकतं. त्यासाठी खांदा सदैव तयार असतो. तो तुम्हाला आधार देऊ शकतो.” मला असं सांगायला आवडेल की या पृथ्वीवरच्या माझ्या अस्तित्वाचा तुम्ही योग्य उपयोग करून घ्यायला हवा.

आता आपण पटपट आणि थोडक्यात ह्या केन्द्राच्या स्थापनेपासून आजपर्यंत आपण कोणत्या गोष्टी साध्य केल्या ते पाहूया. आपल्याजवळ अतिशय सुस्पष्ट मार्ग आहे; सुस्थापित व्यवस्था आहे. काही जणांची तयारी पूर्ण झालेली आहे आणि ते ऋषींशी संपर्क साधू शकतात. जेव्हा मी इथे नसेन, तेव्हाही हे कार्य सुरू राहील, असेच मार्गदर्शन मिळत राहील. मला वाटते ही फार मोठी कार्यसिद्धी आहे. आपण या ध्यानाच्या सभागृहाखाली, वैश्विक मनोऱ्यात, कुंडलिनी सभागृहात, अंतर मानसामध्ये एवढेच नव्हे तर नुकत्याच आकाराला आलेल्या अंतर वनात देखील प्रचंड प्रमाणात शक्तींचा संचय केला आहे. ह्या शक्ती फक्त आपल्यासाठी नाहीत तर त्या संपूर्ण जगासाठी आहेत. आपण बरेच ज्ञानही संपादन केले आहे आणि त्यातले बहुतांश ज्ञान पुस्तकरूपाने लोकांसमोर आणले आहे. आता आपल्याजवळ माझ्या व्याख्यानांच्या डीव्हीडी आहेत. अभ्यासकेंद्राने इतक्या कमी वेळात तीन पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. अभ्यास केंद्र हा आपल्या मुकुटातला मानाचा तुरा आहे. प्रकाश वहनाची व प्रसारणाची चळवळ आपण सुरू केली आहे. माझ्या दृष्टीने तुम्हा सर्वांना एकत्र आणून मानसा कुटुंब उभे करण्याची कामगिरी सर्वात मोठी आहे.

यापुढील उद्दिष्टे कोणती आहेत? त्यापैकी काहींचा उल्लेख आपण इथे करू. सर्वात महत्त्वाचे आणि निकडीचे उद्दिष्ट आहे ते म्हणजे प्रकाशाबद्दलच्या जागृतीचा प्रसार करणे. आपले यापुढचे लक्ष्य असेल लोकांना तयार करणे व २०१२ सालातून सुखरूप पार पडण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करणे. तसेच एकोप्याला प्रोत्साहन देणे. माझी मोठी महत्त्वाकांक्षा आहे की सर्व प्रकाश कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणून सर्वांचा एकच गट करावा. कधी ना कधी असे घडेल. माझे त्यापुढचे लक्ष्य असेल आध्यात्मिकतेच्या अर्थाबद्दल जागृती पसरवणे. त्याशिवाय इतरही लक्ष्ये असतील उदा. ऋषींशी आणि ईश्वराशी थेट संबंध प्रस्थापित करण्यात प्रत्येकाला मदत करणे, मूल्य प्रणाली विषयी आणि तिचे जाणीवपूर्वक पालन करण्याविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण करणे इ. या सर्वांसाठी कृतींचा आराखडा माझ्याजवळ तयार आहे.

आज मी तुम्हाला एक मंत्र देतो आहे जो तुमचे आयुष्य बदलून टाकेल. तो आहे– क्रोधापासून दूर राहा आणि नम्रतेला आलिंगन द्या. पण याचा अभ्यास तुम्ही जाणीवपूर्वक करायला हवा. ❑

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क ७०० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ–मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट मानसा फाऊंडेशनच्या नावाने काढावा. बंगलोर बाहेरील चेक असल्यास रू. ५० अधिक जोडावे.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## गुरुजींना आलेल्या पत्रांतील काही वेचे

संकलनः वैशाली जोशी, अनुवादः ललिता तीर्थ

आय् गुरुजी भाग २ वाचायला खूप आवडले. ह्या पुस्तकामध्ये अनेक रहस्यांचा उलगडा केला आहे. हे वाचल्यानंतर आपल्या लक्षात येते कि दैवी शक्तींच्या अमाप योजनांना समजून घेण्यास आपण अतिशय खुजे आहोत, यद्यपि आपल्या मनाला सर्वच बाबतीत प्रत्यक्ष पुरावा हवा असतो. सर्वात महत्त्वाची शिकवण ही आहे की, देवाला शरण जाऊन साधना सुरु ठेवायला हवी.

–प्रो. ए. शांताराम

“२०१२, End or Beginning”, या पुस्तकांत दिलेली माहिती, एकदम चकित करणारी आहे. त्यातील शब्दन्शब्द खरे आहेत, असा माझा विश्वास आहे. प्रकाश देह धारण करू शकणाऱ्या साधकांना या स्तरावरून शंबला सारख्या अगदी निराळ्या उच्च स्तरावर पोहोचविले जाईल, असे वाचल्यानंतर मला आपल्या शंबला गटातील ध्यानाचे महत्त्व आता कळत आहे. –एक साधक

“बुक ऑफ रिफ्लेक्शन्स”, हे एक अद्वितीय पुस्तक आहे. त्यातील प्रत्येक शब्दात एक चैतन्यमय अस्तित्व आहे आणि संपूर्ण पुस्तकातच एक प्रकारची स्तब्धता आणि शांती जाणवते. ते इतके हृदयस्पर्शी व वैश्विक आहे की, ते वाचताना माझे आनंदाश्रू मी थांबवू शकले नाही. पुस्तक वाचल्यावर माझ्या हे लक्षात आले की, शुद्ध चैतन्याचा अनुभव घेण्यासाठी ध्यान हाच एकमात्र मार्ग आहे. –डी. सत्यवाणी

एप्रिल महिन्यात तपोनगराला आम्ही भेट दिली. तेथील प्रत्येक साधक अत्यंत विनयशीलतेने वागताना मी पाहिला, त्यातून बरेच काही शिकायला मिळाले. निघण्याचा दिवस व नंतर वेळ सुद्धा जवळ आली तरीही गुरुजींना भेटता आले नाही त्यामुळे मन नाराज झाले. निघताना अमर प्रभूंच्या जवळ बसून मी माझ्या भावना व्यक्त केल्या व त्यांना सर्व सांगितले. एखाद्या मुलीला आपले माहेर सोडताना जे दुःख होते, तसेच मला झाले. अमर प्रभूंना प्रार्थना करून जड अंतःकरणाने आम्ही बाहेर पडलो तर गुरुजी आमच्या समोर उभे! ते नुकतेच गाडीतून बाहेर पडले होते. गुरुजी थांबून आमच्याशी बोलले व त्यांनी आम्हाला आशीर्वाद दिला. –भारती शिंगाडे

डोअरवेज च्या जून अंकातील आपल्या शेवटच्या उद्गारांनी खरोखर जबरदस्त धक्का दिला. आम्हा सर्वांविषयी वाटणारे प्रेम आणि भावना समजण्याचा मी नम्रपणे प्रयत्न करतो, परंतु तरीही एक विश्वास वाटतो की, जे लोक घसरले किंवा चुकले ते परत उभे राहतील आणि ते अशा प्रकारे चमकतील की, आपल्याला त्यांचा सार्थ अभिमान वाटेल. –एकनाथ कुलकर्णी

आपल्या उत्तराने माझ्या मनामध्ये संमिश्र भावनांचा कल्लोळ माजला. एकतर पराकोटीचा आनंद झाला कि एका थोर महर्षीने आपला मोठेपणा बाजूस ठेवून माझ्या सारख्या साध्या माणसास पत्र लिहिले, त्याच बरोबर मला दिलेल्या सन्मानाबद्दल संकोच वाटला. आपण यातून मला असा धडा शिकवला आहे की, कितीही उच्च पदास माणूस पोहोचला तरी त्याच्यामधील विनम्रपणानेच त्याची खरी ओळख पटते. –वि. एन. एस. मूर्ती

आपल्या शब्दांनी नेहमीच दिलासा मिळतो. आपल्या डी.व्ही.डी पाहणे माझ्यासाठी श्वासोच्छ्वासासारखे आहे. जेव्हा मी सप्तर्षी गुहे मध्ये बसले आहे अशी कल्पना करून प्रांजळपणे माफी मागते तेव्हा मला शांत वाटते. श्रीमती सोलुंट्रांनी म्हटल्याप्रमाणे माझ्या मनातील अस्वस्थता मी मान्य केली पाहिजे आणि त्यावर प्रेमाचे पांघरूण घातले पाहिजे यातच माझे हित आहे. आता माझ्या असे लक्षात येते कि गेली सात वर्षे मी संतापाने जळत होते. क्षमा करणे, वस्तुस्थितीला सामोरे जाणे आणि तरीही प्रेम करत राहणे हे मला थोडेसे अवघड वाटते, परंतु मला ते केलेच पाहिजे.

आपण गुरुपेक्षा माझे जिवलग मित्र जास्त आहात असे मला वाटते, त्यामुळे आपल्या जवळ मी खुशाल आपले मन मोकळे करू शकते.

–प्राजक्ता जानोरकर

माझ्या सारख्या अवघड व्यक्तीशीही आपण ज्या सहनशीलतेने आणि ममतेने वागता, त्यामुळे आपल्याबद्दल मला खूप प्रेम वाटतं आणि आपलं खूप कौतुक ही वाटतं. मुंबईच्या भेटीत, आपले शब्द आमच्या तहानलेल्या हृदयाला पावसाच्या सरींप्रमाणे वाटले. मी जाणले की, मी एका महागुरुंना शरणागत झाले आहे आणि ते त्यांच्या सर्वच लोकांना पूर्ण संरक्षण देतील. मला आपल्या जीवितकार्याची कल्पना आहे – प्रकाश प्रसारणाची चळवळ. मी माझे संपूर्ण जीवन आपल्या चरणांवर वाहते. –वर्षा

# प्रश्नोत्तरे

संकलनः शोभा राव, अनुवादः सुनिता देशपांडे

**प्र. काहींना ध्यानात अनुभव येतात पण इतर त्या पासून वंचित राहतात असे का?**

उ. जर मी त्या व्यक्ती समोर बसलो तर त्या विशिष्ट व्यक्तिला अनुभव का येत नाही हे मला समजू शकेल. शुद्धता आणि विनम्रता ध्यानात अनुभव मिळण्यात मदत करतात.

**प्र. गेल्या कांही दिवसांपासून २०१२ या वर्षाबद्दल आपले उद्‌गार फारच भीती उत्पन्न करणारे आहेत. असे का?**

उ. परिस्थिती गंभीर आहे. हे सत्य आहे. या बद्दल आपण कधीच बोललो नव्हतो. त्या बद्दलचे गांभीर्य आपल्याला माहीत नव्हते. जेव्हा २०१२ साली काय घडेल हे आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत, तेव्हा स्वाभाविकच आहे कि आपण त्यासाठी तयार राहू. लोकांनी परिस्थिती करिता तयार व्हावे म्हणून त्यांना सावधान करणे आवश्यक आहे. त्यामुळे मला या गोष्टींना परत परत उजाळा देणे जरुरी आहे.

**प्र. २०१२ या साला पूर्वी जे लोक आपल्या स्वतःत बदल घडवून आणणार नाहीत त्यांचे पुढे काय होईल ?**

उ. आपल्याला माहीत नाही. प्रथम आपण आपल्यात परिवर्तन आणूया.

**प्र. आपण फोटॉन बेल्टशी संभाषण साधू शकतो का ?**

उ. फोटॉन बेल्टशी कोणीही संभाषण साधू शकतो किंवा बोलू शकतो. त्यासाठी त्याचे तुम्हाला केवळ स्मरण करणे आवश्यक आहे. पण जेव्हा तुम्ही अशा दिव्य व्यक्तित्वाशी बोलण्याचा प्रयत्न करता तेव्हा तुम्ही आपल्या विचार विनिमयाचा स्तर उंचावला पाहिजे. तुमच्या जवळ त्याच्याशी चर्चा करण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण अशा गोष्टी असायला हव्यात.

**प्र. आपण ज्या प्रकाशाचे प्रवहन (channeling) करतो आणि जो प्रकाश आपण ध्यान करताना दिसलेल्या दृश्यात पाहतो, असे हे दोन्ही प्रकाश एकच आहेत का?**

उ. दोन्ही एकच प्रकाश नव्हेत. अज्ञातातून पहिल्यांदा प्रकाश, दिव्य प्रकाश प्रकटला. या प्रकाशातूनच सगळे काही बाहेर पडले. ज्या प्रकाशाचे आपण प्रवहन करतो तो हाच दिव्य प्रकाश होय.

**प्र. जेव्हा आपण मोठ्याने मंत्रघोष करतो तेव्हा तो प्रभावी, खूप जास्त परिणामकारक असतो. मग आपण मनातल्यामनात मंत्रघोष करतो तेव्हा त्याचा काय परिणाम होतो?**

उ. सर्वप्रथम हा जो समज आहे तो चुकीचा आहे. मंत्राचे उद्‌घोषण मन करत असते. आणि मन तेव्हाच जास्त कार्यक्षम असते जेव्हा ते शांत असते. म्हणून तुम्ही जर मंत्र मनातल्यामनात म्हणत असाल तर तो केव्हाही जास्त परिणामकारक असतो.

**प्र. आत्म साक्षात्कार म्हणजे काय? देवाचा साक्षात्कार म्हणजे काय ?**

आत्म साक्षात्कारात सर्वप्रथम आपल्याला, आपण देवाचा अंश आहोत, याची जाणीव होते. आणि जेव्हा आपण स्वतः देव आहोत, याची आपल्याला जाणीव होते, तेव्हा तो देवाचा साक्षात्कार असतो.

**प्र. ध्यान हे पूजेपेक्षा श्रेष्ठ आहे का?**

उ. होय. जेव्हा आपण पूजा करतो तेव्हा आपल्या मनात आपण नेहमी द्वैतभाव बाळगतो. आपण वर्षानुवर्ष आणि जन्मोजन्मी पूजा करतो, तेव्हा द्वैतावस्था ही सुरूच राहते. पण जेव्हा आपण ध्यान करतो, तेव्हा आपण देव होतो, आपण देवाला अनुभवतो. आपण अद्वैतावस्थेत प्रवेश करतो. जेव्हा आपण पूजा करतो, तेव्हा आपली ओळख ही वेगळी राहते जसे मी, माझे नाव वगैरे आणि तो, देव वगैरे. ध्यानात ही ओळख नाहीशी होते. जसजशी आपण ध्यानात प्रगती करतो तसे आपण देव आहोत, हे आपल्या लक्षात येते आणि आपण देव बनतो. म्हणून निश्चितच ध्यान हे पूजेपेक्षा श्रेष्ठ आहे.

**प्र. समाधीच्याही पुढे जाणिवेची काय अवस्था असते?**

उ. समाधी पलीकडे जाणिवेची अवस्था ही विस्तारतेची असते. जेव्हा आपण विस्तारित असतो तेव्हा आपण देवाशी एकरूप असतो.

**प्र. वाईट आत्मे सुद्धा नकारात्मक कर्म आकृष्ट करतात का?**

उ. देवाने आत्मे निर्माण केले, त्यात काही सैतान म्हणूनच निर्माण केले. ते खालील पाताळ लोकात राहतात. त्यांचा स्वभावच सैतानी असतो. जरी त्यांनी वाईट गोष्टी केल्या तरी ते कर्म गोळा करत नाहीत. पण असे आत्मे जेव्हा ह्या पृथ्वीतलावर जन्म घेतात तेव्हा त्यांना या पृथ्वीतलाच्या कर्मबंधनांच्या कायद्यांचे पालन करावे लागते. त्यामुळे ते सुद्धा नकारात्मक कर्म आकर्षित करतात. ❑


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| 2012 - End or Beginning | 120/- |
| iGuruji - Vol 1 | 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| A Package from the Rishis (containing 5 Booklets) | 250/- |
| - How to Meditate | |
| - Dhyana Yoga | |
| - Descent of Soul | |
| - Practising Shambala Principles | |
| - Astral Ventures of A Modern Rishi | |
| The Masters Answer | 120/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Guruji Speaks Part - I | 200/- |
| Guruji Speaks Part - II | 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 2 | 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोनः २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोनः ०२५१-२८६-१८९०/२४४-९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोनः २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोनः २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोनः २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोनः २५६७७४०५)


द वर्ड बुक शॉप, कँप (फोनः २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोनः २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोनः ६५९५०३२)

RNI. No. **KARMAR/2008/27314** REGISTERED
Date of posting Newsletter-**25th** of Every Month. No. of Pages-**8**



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

"मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र इथे तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### प्रकाशाचे प्रसारण

दर शुक्रवारी १० ते १ वाजेपर्यंत गुरुजींसोबत ध्यान–साधक प्रकाशाचे प्रसारण करतात. ह्यात सामील होण्यासाठी सर्वांचे स्वागत आहे.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा.

# आध्यात्मिक अनुभव

संकलन: सुधाकर, अनुवाद: सुनिता देशपांडे

प्रकाश प्रवाहित करत असताना मला असे जाणवले की आपली पृथ्वी हा प्रकाश ग्रहण करून खूपच आनंदी झाली आहे. मी तिच्याशी बोलले. मानवतेची जाणीवक्षमता उच्च चैतन्याकडे उंचावल्याबद्दल तिला खूप आनंद झाला होता. मी तिला विचारले की, फोटॉन बेल्टच्या शक्तिंमुळे लोकांना नष्ट होण्यापासून ती त्यांना वाचवू शकते का? ती म्हणाली की, ती कोणालाच वाचवू शकत नाही. पुढे ती म्हणाली, "या सर्व प्रक्रियांचे स्वतः ऋषी निरीक्षण करत आहेत, आणि ह्यापुढे वाईट प्रवृत्तीच्या लोकांना इथे राहू दिले जाणार नाही."

राम नवमीला मी श्रीरामाला शक्ती अर्पण केल्या. ते म्हणाले, "तुझ्यातील प्रकाशाची नेहमी जाणीव असू दे." तेव्हापासून मी माझ्या हृदयाच्या भागात ॐकाराचा ध्वनी ऐकू शकते. हा ध्वनी मला माझ्या आत्म्याच्या प्रकाशाबद्दल सतत जाणीव ठेवण्यात मदत करतो आणि मी माझ्यातून आनंदाचा ओघ सतत बाहेर पडत आहे ह्याचा अनुभव घेते. –अर्चना

बुद्ध–पौर्णिमेच्या रात्री सूक्ष्मदेहाने केलेल्या प्रवासात मी बर्फाच्छादित डोंगरांनी वेढलेली वैशाख दरी पाहिली. ऋषींनी भगवान बुद्धांना आवाहन केले आणि ते प्रकाशातून प्रकट झाले. ते सोनेरी रंगाचे होते पण ते पांढरा प्रकाश विकिरीत होते. तेथे जमलेल्या सगळ्या लोकांशी ते संभाषण करत होते. तेथे मी गुरुजी, अमर महर्षी आणि कित्येक सूक्ष्म देहातील व्यक्तिंना पाहिले. काही काळे लोक त्या जागेत शिरण्याचा प्रयत्न करत होते पण ते प्रकाश क्षेत्राच्या बाहेर होते.

आणखी एके दिवशी प्रकाशाने फोटॉन बेल्टला "पुरुष" म्हणून संबोधित केले. फोटॉन बेल्टने मला पुढील प्रमाणे माहिती दिली– "२१–१२–२००९ ला सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी सूर्य, पृथ्वी आणि आपल्या आकाशगंगेचे केंद्र एका सरळ रेषेत येणार आहेत. त्यामुळे सूर्य आणि पृथ्वी ह्यांचे चुंबकीय आस पालटून तिच्या उत्तर आणि दक्षिण ध्रुवांची अदलाबदल होईल. याचा परिणाम भौतिक पातळीवर सुद्धा होईल. पृथ्वी सुद्धा मनुष्यप्राण्याच्या वाईट कर्मांवर प्रतिक्रिया करील. सृष्टीच्या मुख्य निर्मात्याची अशी इच्छा आहे की, पृथ्वीचा माझ्यात प्रवेश आणि तिचे आकाशगंगेच्या केंद्राच्या रेषेत येणे, या गोष्टी एकाच दिवशी व्हाव्यात". त्याने २०१२ या वर्षानंतर मनुष्यप्राण्याच्या अवस्थेचे दृश्य मला दाखवले. ज्यांनी प्रकाशाला निवडले आहे असे लोक कंपनांच्या वेगळ्या पातळीवर होते. तसेच इतर लोक कंपनांच्या खालच्या पातळीवर होते. दोन्ही गटात अजिबात देवाण–घेवाण किंवा संपर्क नव्हता. "पृथ्वीवर जसे शंबलाचे अस्तित्व आहे, त्याप्रमाणेच हे असेल. स्वतःला शुद्ध बनवा, आपल्या अंतर्मनाची दारे उघडा. मी येथे तुमच्या मदतीसाठीच आहे. मी तुमची जाणीव उंचावण्यासाठीच येथे आहे." त्याने हे पुन्हा पुन्हा सांगितले. फोटॉन बेल्टने निळ्या रंगाच्या शक्ती मला पाठवल्या. –प्रियंका मिश्रा

सूक्ष्म पातळीवर मला एक विचित्र अनुभव आला. एक फार मोठे रुपेरी, गोलाकार, बशीच्या आकाराचे यू.एफ.ओ. आपल्या पृथ्वीवर उतरलेले मी पाहिले. त्याच्या खालच्या बाजूला मध्यभागी एक मोठे गोलाकार भोक होते. त्यातून पांढरा प्रकाश दिसत होता. यू.एफ़.ओ. मधून हळुवार पण विचित्र आवाज बाहेर पडत होते. पृथ्वीवर उतरल्यानंतर अंतराळ यानातून इतर जगातील लोक बाहेर निघाले आणि बघता बघता त्यांनी पृथ्वीवरील लोकांना जखमी करण्यास आणि ठार करण्यास सुरवात केली. ते प्रखर प्रकाश सोडणाऱ्या बंदूकांसारखे विचित्र अस्त्र वापरत होते. लोक भीतीपोटी दूर पळण्याचा प्रयत्न करत होते. दुसऱ्या दिवशी हा हिंसाचार थांबला. यात फार थोडे लोकच जिवंत राहिले होते. विजेच्या अभावामुळे सर्व घरांमध्ये अंधार होता आणि ती निर्मनुष्य होती. फक्त काही मुलं रडत असतांना दिसत होती. सगळीकडे प्रचंड प्रमाणात विनाश दिसत होता. मी सगळ्या ध्यान–साधकांना पाहिले. ते सर्व सुरक्षित होते! –सलील कारखानीस

प्रकाशा चे प्रवहन (channeling) करतांना मला भूमातेचे, साक्षात देवीचे दर्शन झाले! पण तिला अतोनात जखमी अवस्थेत पाहून मी दुःखी झालो. ती मला म्हणाली, "विषुववृत्तीय भागात कृपया खूप जास्त शक्ती प्रस्थापित करा. माझे प्रियजन काळ्या शक्तिंमुळे प्रभावित झाले आहेत. जास्तीतजास्त प्रकाशाचे त्यांच्याकडे प्रवहन करा. २०१२ वर्ष सुरू होण्यापूर्वी त्यांच्यात बदल होण्यासाठी हा प्रकाश उपयोगी पडेल." तिने मला तिच्यातील कमकुवत भागात शक्तिंना प्रस्थापित करण्यास सांगितले आणि माझ्याकडून ते काम व्यवस्थित व्हावे म्हणून तिने मला शक्ती पुरवल्या आणि मला आशीर्वाद दिले. –प्रताप किशन

PRAKASHMARG An Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 200/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban-562 149 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore-86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation, Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban-562 149.
Editor : Jayant Deshpande